९.५ रांगडा हंगामातील कांदा काढणीस तयार झाला असल्यास तीन आठवडे आधी कांदयाचे पाणी बंद करावे.

९.६ रबी हंगामातील कांदा पीक दोन महिन्याचे झाले असलेस नत्र खताचा दुसरा हप्ता दयावा व पीक तण मुक्त ठेवावे.

९.७ वांगी व टोमॅटोची रोपे लावताना प्रति लिटर पाण्यात २० ग्रॅम ट्रायकोडर्मा मिसळून रोपांची मुळे त्यात १० मिनिटे बुडवून घ्या.

९.८ वेलवर्गीय भाज्यामध्ये मादी फुलांचे प्रमाण वाढविण्यासाठी बी उगवून आल्यानंतर वेल २ व ४ पांनावर असताना (काकडी, दूधीभोपळा, तांबडा भोपळा यासाठी) १०० पीपीएम तीव्रतेचे एन.ए.ए. हे संजिवक फवारावे तसेच कलिंगडासाठी टीबा (२, ४, ५-ट्राय आयडो बेन्झाईक ॲसिड) हे संजिवक २५ ते ५० पीपीएम फवारावे (२५ ते ५० मिलीग्रॅम प्रति लिटर पाणी).

९.९ वेलवर्गीय भाज्यावरील काळे, तांबडे भुंगेरे या किडीच्या नियंत्रणासाठी ॲसिफेट ७ ग्रॅम किंवा ईमिडाक्लोप्रिड ७ मिली वा कॉन्फिडॉर १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

९.१० उन्हाळी टोमॅटो लागवडीसाठी रोपे तयार झाली असल्यास लागवड करावी.लागवडीच्या वेळी शिफारशीत रासायनिक खत मात्रेच्या ५० टक्के नत्र ,संपुर्ण स्फुरद व पालाश दयावे.

## १०) <u>पशुविज्ञान व दूग्धशास्त्र</u> :

१०.१ आवश्यकतेनुसार रब्बी चारा पिकांना ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे.

१०.२ आफ्रिकन टॉल मका, सदाबहार चवळी, जॉईंट बाजरा, रूचिरा किंवा स्वीट सोरगम ज्वारी इत्यादी ऊन्हाळी हिरव्या चारा पिकांची टप्याटप्याने पेरणी करा.

१०.३ कडबा, भाताचे पिंजर आणि विविध प्रकारचा भुस्सा यासारख्या वाळल्यालेल्या चाऱ्यांचे आगीपासून संरक्षण करा.

१०.४ उन्हाची तिव्रता वाढू लागल्याने, दुभत्या जनावरांचे उन्हापासून संरक्षण करा.

१०.५ सर्वच जनावरांना स्वच्छ आणि पुरेसे पाणी वेळचेवेळी मिळेल याची काळजी घ्या.

१०.६ जनावरांचे अंगावरील तसेच गोठ्यातील कृमीपासून संरक्षण करण्यासाठी वरचेवर १२.५% डेल्टामिश्रीत औषधाचा गोठ्यामध्ये फवारणीसाठी उपयोग करा.

## ११. चारापिकांचे नियोजन असे करा :

| चारापिके | पेरणीची वेळ | सुधारित वाण |
|---|---|---|
| ज्वारी | फेब्रुवारी - मार्च | रुचिरा, फुले, अमृता, मालदांडी ३५-१, पुसा चारी |
| मका | फेब्रुवारी - मार्च | आफ्रिकन टॉल, मांजरी कंपोझीट, विजय, गंगा सफेद -२ |
| बाजरी | फेब्रुवारी - मार्च | जायंट बाजरा,बायफ बाजरा |

विस्तार कृषि विदयावेत्ता,
विभागीय विस्तार केंद्र, कृ.म.कोल्हापूर

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
कोल्हापूर